

त्वरा करा, महामॅरेथॉनच्या नावनोंदणीसाठी मोजकेच दिवस शिल्लक

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमत समूहातर्फे १७ डिसेंबर रोजी महामॅरेथॉनची घोषणा होताच महाराष्ट्रातील आवडत्या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या हजारो धावपटूंनी सहभाग निश्चित केला. आता नावनोंदणीसाठी मोजकेच दिवस बाकी आहेत आणि आपला सहभाग वेळेच्या आत निश्चित करणाऱ्या धावपटूंसाठी विशेष सवलत आहे. या सवलतीचा लाभ घ्यायचा असल्यास धावपटूंनी लवकरात लवकर त्यांच्या नावाची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाची होणारी सर्वात लोकप्रिय अशा औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. औरंगाबाद महामॅरेथॉन २१ कि.मी. अर्धमॅरेथॉन, फॅमिली रन (३ कि.मी.), ५ कि.मी. फन रन, १० कि.मी., २१ कि.मी. आणि डिफेन्स २१ कि.मी. अशा अंतराची असणार आहे.

नावनोंदणीसाठी २ डिसेंबर अंतिम तारीख

लोकमत समूहातर्फे १७ डिसेंबर रोजी आयोजित महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग २ डिसेंबरपर्यंत निश्चित करता येणार आहे. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करता येणार आहे. या महामॅरेथॉनमध्ये शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग होऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आयोजकांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुक धावपटूंना औरंगाबाद, कोल्हापूर व नागपूर तिन्ही महामॅरेथॉनची नोंदणी एकाच ठिकाणी करता येईल. अधिक माहितीसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१९०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनसाठी नोंदणी ऑनलाइन **www.mahamarathon.com** या संकेतस्थळावर करता येईल

Circuit Run

Run Type	Cities	Invitation Price (Including GST)
21K	3 cities	₹2520
	2 cities	₹1920

Run Type	Cities	Invitation Price (Including GST)
10K	3 cities	₹2020
	2 cities	₹1540

Distance	Regular Fee	Early Bird Fee (Before 15th Nov.)	Registration Fee Includes
3 KM Family Run 2 Adults + 2 Children (<12)	₹1200	₹960	Goodie Bag + Medal + Breakfast
5 KM Adult 12+	₹600	₹480	T Shirt + Goodie Bag + Medal + Breakfast
10 KM Adult 16+	₹950	₹760	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast
21 KM Adult 18+	₹1200	₹960	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast
Defense 21 KM	₹1200	₹800	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast

औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्याचा अनुभव हा अविस्मरणीय असाच होता. सकाळी धावल्याने अथवा व्यायाम केल्याने दिवसभरात काम करण्याची एक नवी ऊर्जा मिळते, तसेच आरोग्य चांगले लाभते. युवकांनी या स्पर्धेत आवर्जून आपला सहभाग निश्चित करावा. जेणेकरून आरोग्याच्या समस्या कमी होतील.

-डॉ. विनोद तोतला

औरंगाबाद मॅरेथॉनमध्ये आम्ही गतवर्षी सहभाग नोंदवला होता. लोकमत समूहातर्फे आयोजित या उपक्रमाचे आयोजन खूपच चांगले होते. बॅगेज काऊंटर्स, फिटनेस झोन, धावणाऱ्या धावपटूंसाठी एनेजझॉल, पाणी, मोसंबी ज्यूस, कूल डाऊन एरिया अशा चांगल्या व्यवस्था होत्या. यंदाही आम्ही सर्व मित्रपरिवारांसह या महामॅरेथॉनमध्ये धावणार आहोत.

-रितेश परसवानी

औरंगाबाद महामॅरेथॉनविषयी सर्वच शहरांत उत्सुकता आहे. गतवर्षी ५ हजारांपेक्षा जास्त धावपटूंनी सहभाग नोंदवला होता. लहान बालगोपाळांपासून ज्येष्ठ नागरिक या सर्वांनीच लोकमततर्फे आयोजित महामॅरेथॉनमध्ये सहभाग निश्चित करावा. औरंगाबाद भागो रे... या घोषवाक्यासह आम्ही सर्व या महामॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी सज्ज झालो आहोत.

-अक्षिता मुसंडे

लोकमत महामॅरेथॉन

औरंगाबाद 17/12/2017

कोल्हापूर 28/01/2018 | **नागपूर** 11/02/2018

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

विद्यापीठ अधिसभा निवडणूक : विधिमंडळातील विरोधी पक्षनेत्यांपासून मंत्र्यांची फोनाफोनी

राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेसाठी पहिल्या टप्प्यात शुक्रवारी (दि.२४) मतदान होत आहे. या मतदानात एक-एक मत महत्त्वाचे असल्यामुळे थेट विधिमंडळातील दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, भाजपच्या प्रदेशाध्यांक्षसह मंत्र्यांनी फोनाफोनी सुरु केली आहे. आपल्या समर्थकाला मत देण्यासाठी मतदारांना विनंती करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेतील महाविद्यालयीन प्राध्यापक, विद्यापीठ प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक आणि विद्यापरिषदेसाठी शुक्रवारी मतदान होणार आहे. चार जिल्ह्यांत मतदार असल्यामुळे उत्कर्ष पॅनल, विद्यापीठ विकास मंच आणि बामुक्टो संघटनेच्या उमेदवारांनी सर्व महाविद्यालयांना भेटी देत मतदान करण्याची मागणी केली आहे. मात्र, आता शेवटच्या टप्प्यात सर्व प्रचार फोनाफोनी आणि बैठकांद्वारे करण्यात येत आहे. संस्थाचालक गटातून निवडणूक लढवीत असलेले भाऊसाहेब राजळे यांच्यासाठी थेट विधासभेसाठी विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी काही संस्थाचालक मतदारांना फोन करून सहकार्य करण्याचे आवाहन केल्याचे समजते, तर विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी उत्कर्ष पॅनलमध्ये आपल्या दोन समर्थकांना उमेदवारी मिळवून दिली आहे. यामुळे तेसुद्धा या निवडणुकीकडे बारकाईने लक्ष ठेवून आहेत. उत्कर्ष पॅनलचा किल्ला आमदार सतीश चव्हाण एकहाती लढवत आहेत. सर्व नियोजन त्यांच्या कार्यालयातूनच चालते, तर काँग्रेसच्या खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, आमदार विक्रम काळे, आमदार अमरसिंह पंडित, आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार कल्याण काळे यांच्यासह इतर दिग्गज राजकीय नेत्यांनी उत्कर्ष पॅनलला पाठबळ दिले आहे. याशिवाय उत्कर्ष पॅनलमध्ये काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संबंधित असलेल्यांना उमेदवारी देण्यात आलेली असल्याचे सर्वांचाच पाठिंबा मिळाला असल्याचा दावा उत्कर्षचे उमेदवार डॉ. राजेश करपे यांनी केला. विद्यापीठ विकास मंचसाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे पाटील, ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी औरंगाबादेत बैठक घेतली असल्याचे मंचचे निमंत्रक डॉ. गजानन सानप यांनी सांगितले. याशिवाय उत्कर्ष पॅनलच्या पायाखालची वाळू सरकल्यामुळे आमदार चार मते असलेल्या महाविद्यालयातही प्रचारासाठी जात आहेत. त्यांना त्यांचा पराभव स्पष्ट दिसून आल्यामुळे उत्कर्ष पॅनलवाल्यांना पळता भुई थोडी झाली आहे. या निवडणुकीत विद्यापीठ विकास मंच बहुमताने विजयी होणार असल्याचा दावाही डॉ. सानप यांनी केला. डॉ. सानप यांच्या आरोपांविषयी उत्कर्ष पॅनलचे डॉ. राजेश करपे यांना विचारले असता, त्यांनी डॉ. सानप यांना महाविद्यालयात गेल्यानंतर स्वत:ची ओळख करून द्यावी लागते. तसे आमदारांचे नाही. त्यांना मनणारा, ओळखणारा एक वर्ग आहे. आमदारांचे पाय जमिनीवर असल्यामुळे ते प्रत्येक ठिकाणी जात असल्याचे स्पष्टीकरण दिले. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार व माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पहिल्यांदाच स्वतंत्र भूमिका घेत विद्यापीठ विकास मंचकडून संस्थेचे तीन उमेदवार दिले आहेत. या उमेदवारांना मत देण्यासाठी स्वत: जयदत्त क्षीरसागर प्रयत्नशील असल्याचे समजते. शिक्षक आणि विद्यापरिषद गटात निवडणूक लढवीत असलेल्या बामुक्टोचा एकच ध्यास आहे.

प्राध्यापकांचे प्रश्न केवळ संघटनाच सोडवू शकते. यासाठी निवडणुकीत जोरदारपणे उतरलो असल्याचे बामुक्टोच उमेदवार डॉ. विक्रम खिलारे यांनी सांगितले.

२६ तारखेला सर्व कळेल

कोणाला पळता भुई झाली आणि कोणात किती दम आहे हे २६ तारखेला कळेल. त्यापूर्वी बोलण्यात किंवा कोणाला महत्त्व देण्यात काय उपयोग? उत्कर्षकडे प्राध्यापक गटात २,७०० पेक्षा अधिक मतदार आहेत. संस्थाचालक गटात तीन उमेदवार दिले ते सर्व निवडून येतील. प्राचार्य गटातही हीच स्थिती आहे. एक-दोन अपवाद वगळता उत्कर्ष पॅनल सर्व जागा जिंकेल.

-सतीश चव्हाण, आमदार, मराठवाडा पदवीधर मतदारसंघ

प्रबळ विरोधक म्हणून उभे

आतापर्यंत निवडणूक एकतर्फी होत असे. यावेळी आम्ही प्रबळ विरोधक म्हणून उभे ठाकलो. लोकांना बदल हवा आहे. त्यासाठी सक्षम पर्याय निर्माण झाला आहे. जालना, बीड जिल्ह्यांतील प्रस्थापित मंडळीसुद्धा आमच्यासोबत असल्यामुळे विजय निश्चित आहे.

- गजानन सानप, निमंत्रक, विद्यापीठ विकास मंच

विद्यापीठ अधिसभा निवडणूक पुढे ढकलल्याची अफवा

- औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यासाठी शुक्रवारी मतदान होणार आहे. ही निवडणूक औरंगाबाद खंडपीठाच्या निर्देशानुसार पुढे ढकलल्याच्या अफवा सोशल मीडियावर उठवल्या आहे. याविषयी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. साधना पांडे यांना विचारले असता, त्यांनी असा कोणताही निर्णय झालेला नसून, या अफवा असल्याचे सांगितले.
- विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाशी संलग्न झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांना मतदानाचा अधिकार दिल्याच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. याविषयी बुधवारी औरंगाबाद खंडपीठात सुनावणी झाली आहे. यावर कोणताही निर्णय झाला नसून, पुढील सुनावणी शुक्रवारी (दि.२४) होणार आहे. मात्र याच दिवशी मतदान आहे.
- याविषयी सोशल मीडियावर काही लोकांनी मेसेज टाकून औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाने निवडणूक स्थगित झाली असून, निवडणुकीची नवीन तारीख लवकरच जाहीर होणार असल्याचे टाकले आहे. यामुळे शिक्षण वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. याविषयी विद्यापीठाच्या कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. साधना पांडे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या अफवा असल्याचे स्पष्ट केले.
- विद्यापीठाने निवडणुकीसाठी स्वतंत्रपणे पोर्टल तयार केलेले आहे. त्यावर देण्यात येणारी सूचना ही अधिकृत असते. त्यावर निवडणूक पुढे ढकलली किंवा काही बदल झाले याविषयी कोणतेही पत्र टाकण्यात आलेले नाही. किंवा न्यायालयाने असा कोणताही निकाल दिल्याचे विद्यापीठ प्रशासनापर्यंत पोहोचलेले नसल्यामुळे पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार निवडणूक होत आहे. त्यात कोणताही बदल झालेला नाही, असेही डॉ. पांडे यांनी स्पष्ट केले.
- विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढे ढकलल्याची अफवा विद्यापीठ विकास मंचचे संस्थाचालक गटातील उमेदवार चंद्रकांत मुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकून उठवली असल्याचा आरोप मुप्टाचे संस्थापक सचिव प्रा. सुनील मगरे यांनी केला.
- एका उमेदवाराने न्यायालयाचा हवाला देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाने मुळे यांच्यावर अफवा पसरविल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याविषयी उमेदवार चंद्रकांत मुळे यांना विचारले असता त्यांनी संबंधित मेसेज चुकीने पाठविण्यात आला असून, त्याबद्दल दिलगीर असल्याचे सांगितले.

'पद्मावती' चित्रपटावर महाराष्ट्रात बंदी घालावी या मागणीसाठी बुधवारी शिवसेनेतर्फे निदर्शने करण्यात आली.

'पद्मावती'च्या प्रदर्शनाला शिवसेनेचा विरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : पद्मावती चित्रपटावर महाराष्ट्रात बंदी घालावी, या मागणीसाठी शिवसेनेने बुधवारी कॅनॉट गार्डन परिसरात निदर्शने केली. मध्यप्रदेश सरकारने या चित्रपटावर बंदी घातली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने बंदी घालावी, अशी मागणी शिवसेनेने केली.

निदर्शनात जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, महिला आघाडीच्या रंजना कुलकर्णी, सुनीता आऊलवार, पूर्व विधानसभा संघटक राजू वैद्य, विजय वाघचौरे, दिग्विजय शेरखाने, ज्ञानेश्वर डांगे, अनिल पोलकर, बाबासाहेब डांगे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, शिवसेना अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची हजेरी होती. खा. चंद्रकांत खैरे शहरात असताना सहभागी झाले नाहीत, तर आ. संजय शिरसाट, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, सहसंपर्कप्रमुख सुहास दाशरथे, महापौर, सभागृह नेते, माजी सभागृह नेत्यांनी या निदर्शनाकडे पाठ फिरविली. मागील तीन दिवसांत पक्षाने केलेल्या निदर्शनात काही जण सहभागी झाले तर काही जण आले नाहीत, यातून पक्षात दुफळी पडल्याचे दिसते आहे.

३७ दुभाजक, २२ चौक सुशोभीकरणाचे प्रयत्न

आवाहन : दत्तक घेतलेल्या संस्थांची उदासीनता

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : महापालिकेचा वर्धापन दिन ८ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. या निमित्ताने शहरातील ३७ प्रमुख रस्त्यांवरील दुभाजक आणि महत्त्वाचे २२ चौक सुशोभित करण्याचा प्रयत्न मनपा पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या कामासाठी नर्सरी चालकांना विनंती करण्यात आली आहे. या आवाहनाला ते किती प्रतिसाद देतात हे दोन दिवसांत स्पष्ट होणार आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या उपक्रमानंतर स्वच्छता आणि सुशोभीकरणावर भर देण्यात येत आहे. ८ डिसेंबरला मनपाचा वर्धापन दिवस असून, या निमित्ताने शहर सुशोभीत कसे करता येईल, याची प्लॅनिंग सुरू आहे. महापौर नंदकुमार घोडेले यांनी बुधवारी सिद्धार्थ उद्यानात नर्सरी चालकांची बैठक घेतली. या बैठकीस स्थायी समितीचे सभापती गजानन बारवाल, नगरसेविका शिल्पाराणी वाडकर, अतिरिक्त आयुक्त श्रीकृष्ण भालसिंग, उपायुक्त वसंत निकम, कार्यकारी अभियंता हेमंत कोल्हे, विद्युत विभागाचे उपअभियंता के. डी. देशमुख, उद्यान अधीक्षक विजय पाटील आदींची उपस्थिती होती.

बैठकीत शहरातील दुभाजक आणि चौकांची स्थिती अत्यंत वाईट असून, दुभाजक आणि चौकात सर्वत्र धूळ, माती साचलेली आहे. त्यामध्ये लावण्यात आलेली हिरवळ आणि झाडे गायब झाली आहेत. काही दुभाजकांमध्ये झाडे आहेत, पण त्यांची निगा राखली जात नाही. हे चित्र बदलण्यासाठी ३७ दुभाजक आणि २२ चौकांचे सुशोभीकरण करण्याची जबाबदारी नर्सरी चालकांवर सोपवण्यात आली.

चौकाचे सुशोभीकरण साकला नर्सरी आणि पल्लवांकुर नर्सरी यांच्यामार्फत केले जाईल, तसेच दुभाजकांमध्ये झाडे आणि हिरवळ लावण्याचे काम नर्सरी चालकांनी हाती घेऊन ८ दिवसांत पूर्ण करावे, पाण्याची व्यवस्था करावी, असे यावेळी महापौरांनी सांगितले.

'बाटु'शी संलग्न : अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्रतिनिधींच्या याचिकेवर २४ रोजी सुनावणी

डॉक्टरांची याचिका निकालासाठी राखीव

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु झाल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीतील याचिकाकर्त्या डॉक्टरचे नामनिर्देशन पत्र रद्द करणाऱ्या कुलगुरुंच्या आदेशास आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. आर.एम. बोर्डे आणि न्या. विभा कंकणवाडी यांनी बुधवारी (दि.२२ नोव्हेंबर) निकालासाठी राखून ठेवली आहे.

तसेच रायगड येथे बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ (बाटु) सुरु झाल्यामुळे त्या विद्यापीठाशी संलग्न अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांचे विभागप्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य आदी गणांतील प्रतिनिधी मतदारांना अधिसभा निवडणुकीत मतदान करू शकत नसताना त्यांना नामनिदेर्शनपत्र भरण्याची मुभा देणाऱ्या कुलगुरुंच्या आदेशास आव्हान देणाऱ्या याचिकेवर २४ नोव्हेंबर रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली आहे.

अधिसभेची निवडणूकसुद्धा २४ नोव्हेंबर २०१७ रोजी होणार असल्यामुळे 'बाटु'शी संलग्न मतदारांच्या मतपत्रिका स्वतंत्र ठेवण्याचा आदेश देण्याची याचिकाकर्त्यांची विनंती खंडपीठाने अमान्य केली.

डॉ. नरेंद्र काळे यांची याचिका

अंबाजोगाई येथील डॉ. नरेंद्र काळे (डेन्टिस्ट) यांनी ॲड. नंदकुमार खंदारे यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत म्हटल्यानुसार नवीन विद्यापीठ कायदा २०१६ नुसार अधिसभा निवडणुकीत विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधरांमधून १० जणांना निवडून दिले जाते. डॉ. काळे व इतर डॉक्टरांनी पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादीत त्यांच्या नावांची नोंदणी करण्यासाठी केलेले अर्ज कुलगुरुंनी नामंजूर केले. नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे स्वतंत्र विद्यापीठ कार्यरत असल्यामुळे डॉक्टरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे नोंदणी करता येणार नाही, असे कुलगुरुंनी अपिलांवरील आदेशात म्हटले आहे. या आदेशाला डॉ. काळे यांनी आव्हान दिले आहे.

विद्यापीठ कायद्यात 'पदवीधरांना' प्रतिनिधित्व करता येईल, असे म्हटले आहे. कुठल्याही शाखेचा किंवा विषयाचा पदवीधर असा उल्लेख नाही. म्हणून विषयानुसार पदवीधरांमध्ये भेदाभेद करता येणार नाही. कोल्हापूर, मुंबई, पुणे, नांदेड आदी विद्यापीठांनी वैद्यकीय पदवीधरांना प्रतिनिधित्व दिले आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. खंडपीठाने यापूर्वी अंतरिम आदेशाद्वारे डॉ. काळे यांच्या नावाची नोंदणी करण्याचा आणि त्यांची इच्छा असल्यास उमेदवारी अर्ज भरण्याची मुभा दिली आहे.

आज ही याचिकासुद्धा सुनावणीस आली असता खंडपीठाने वरीलप्रमाणे आदेश दिला. या प्रकरणात याचिकाकर्त्यातर्फे ॲड. निखील टेकाळे यांच्याकरीता ज्येष्ठ विधिज्ञ व्ही.जे. दीक्षित, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे कुलगुरु आणि कुलसचिवांचे विशेष वकील म्हणून ॲड. उदय मालते, राज शासनातर्फे मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे आणि सहायक सरकारी वकील स्वप्नील जोशी काम पाहत आहेत.

'बाटु'शी संलग्न प्रतिनिधींची याचिका

- रायगड येथे बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ (बाटु) सुरु झाल्यामुळे त्या विद्यापीठाशी संलग्न अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांचे विभागप्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य प्रतिनिधी, शिक्षक प्रतिनिधी आणि विद्यापीठाचे शिक्षक प्रतिनिधी हे कायद्यानुसार त्या त्या गटात मतदान करु शकणार नाहीत, असे याचिकाकर्ता मनोज शेवाळे यांचे म्हणणे आहे.

- असे असताना कुलगुरुंनी १७ ऑक्टोबर आणि १८ ऑक्टोबर २०१७ रोजी उपरोल्लेखित प्रतिनिधींचे अवैध ठरलेले अर्ज वैध ठरविले होते. त्या आदेशाला मनोज शेवाळे यांनी आव्हान दिले आहे.

विमानतळ विस्तारीकरण; मार्ग झाला मोकळा...

अध्यादेश : भूसंपादनासाठी विमानतळ विकास कंपनीची नियुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : चिकलठाणा आंतरराष्ट्रीय विमानतळ धावपट्टी विस्तारीकरण करण्यासाठी शासनाने २२ नोव्हेंबर रोजी अध्यादेश काढून भूसंपादन संस्था म्हणून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे विमानतळ विस्तारीकरणाला मोठ्या प्रमाणात वेग येण्याची शक्यता आहे. या कंपनीने मोजणी शुल्काचा भरणा तात्काळ करण्याचे आदेशही शासनाने दिले आहेत. धावपट्टी विस्तारीकरणातील प्रमुख अडसर दूर झाला आहे. चिकलठाणा विमानतळ विस्तारीकरणाचा प्रश्न रखडल्यामुळे अनेकदा बैठका घेऊन चिंतन करण्यात आले. गेल्यावर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबादेत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतही विस्तारीकरणाबाबत निर्णय झाला. त्यासाठी दोनशे कोटींचा निधी देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली होती. विलंबामुळे भूसंपादनासह ६०० कोटी रुपयांपर्यंत खर्चाचा आकडा समोर आला.

डीएमआयसी प्रकल्पात किया मोटार्स हा अँकर प्रकल्प येणार होता. कंपनीने विमानतळावर आंतरराष्ट्रीय उड्डाणाची सुविधा नसल्याने प्रकल्प आंध्र प्रदेशात हलविला.

लोकप्रतिनिधी, उद्योजकांनी विमानतळ विस्तारीकरणाप्रसंगी वारंवार मुख्यमंत्र्यांकडे चर्चा केली. तसेच भूसंपादनातील सिडको व बांधकाम विभागाकडील समस्याही मांडल्या. विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी बैठका घेऊन या विषयाला गती देण्याचा प्रयत्न केला.

जिल्हाधिकारी कार्यालय करणार सर्व्हे, मोजणी

विमानतळ विस्तारीकरणासाठी भूसंपादन संस्था नियुक्तीचा प्रश्न शासनाने सोडविला आहे. संस्था स्थापन झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय भूसंपादनासाठी लागणाऱ्या जमिनीची पाहणी करणार आहे. त्यानंतर जमिनीची मोजणी करील.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521